# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.06.2024** **वार – सोमवार**

---

**मोहोळ**

पुण्यातून आंतरराष्ट्रीय विमान सेवा वाढविण्यासाठी धावपट्टीचा विस्तार करण्याकरिता मोठ्या प्रमाणात आवश्यक जागेचं लवकरात भूसंपादन करण्यात येईल अशी माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात विमानतळाच्या विविध विषयांसंदर्भात आयोजित बैठकीत दिली. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचं मनुष्यबळ उपलब्ध झाल्यानंतर नवीन टर्मिनल देखील सुरु होईल असं ते म्हणाले.

**धावपट्टी**

लोहगाव विमानतळावरील धावपट्टीचा विस्तार झाल्यास या विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरात निर्माण झालेल्या काही उंच इमारती, नवीन बांधकामं आणि वस्त्यांवर देखील काही प्रमाणात बंधनं येण्याची शक्यता आहे. परिसरातील काही वस्त्यांमधून टाकल्या जाणाऱ्या खाद्य पदार्थांमुळं अनेक पक्षी देखील इथं आकर्षित होत आहेत.

**ससून**

ससूनमधील डॉक्टरांनी न्यायवैद्यक प्रकरणात पारदर्शकरित्या काम कसं करावं, याची नियमावली एका समितीनं सुचविली आहे. आपत्कालीन विभागात लवकरच अनेक बदल केले जाणार असून, तिथलं काम अधिक नियोजनबद्ध करण्यात येणार असल्याचं  ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर चंद्रकांत म्हस्के यांनी सांगितलं. डॉक्टर म्हस्के यांनी अधिष्ठातापदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर तातडीनं आपत्कालीन विभागात सुधारणा करण्यासाठी वरिष्ठ डॉक्टरांची समिती नेमली. या समितीनं नुकताच आपला अहवाल अधिष्ठात्यांना सादर केला आहे.

**तोटा**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या तोट्यामध्ये गेल्या 6 वर्षात तिपटीनं वाढ झाली आहे. या तुटीची भरपाई पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेनंच करावी अशी भूमिका महामंडळानं घेतली आहे. 2016-17 या आर्थिक वर्षापर्यंत पीएम पीएमएलचा तोटा 204 कोटी रुपये होता, गेल्या 6 वर्षात तो 734 कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

**शेतकरी-हप्ता**

पी एम किसान योजनेअंतर्गत देशभरातील शेतकऱ्यांना 17 व्या हप्त्याचं वाटप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं उद्या वाराणसी इथून होणार असून पुणे जिल्ह्यातील नारायणगाव इथल्या कृषी विज्ञान केंद्रातून या कार्यक्रमात स्थानिक शेतकरी सहभागी होणार आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले या कार्यक्रमाला नारायणगाव इथं प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत.

**स्कॉच**

प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचनात प्रति थेंब अधिक पीक या सूक्ष्म सिंचन योजनेतील उल्लेखनीय कामाबाद्दल राज्याच्या कृषी विभागाला नवी दिल्लीच्या स्कॉच फाउंडेशनचा यावर्षीचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रति थेंब अधिक पीक योजनेत कागद विरहित प्रक्रिया, तपासणी आणि पर्यवेक्षणाच्या पायऱ्या कमी करून मूळ लाभार्थ्यांसाठी कमी वेळेत थेट अनुदान, कार्यक्षम खत आणि पाणी वापरामुळं कृषी मालाच्या गुणवत्तेत वाढ झाली. राज्यातील सर्व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून

योजनेची व्यापक अंमलबजावणी केल्यामुळं कृषी विभागाला हे सांघिक यश मिळालं असल्याची भावना पुणे कृषी आयुक्तालयाचे फलोत्पादन संचालक डॉक्टर कैलास मोते यांनी व्यक्त केली.

**कर-पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जूनपर्यंत मुदत आहे. त्यामुळं उद्यापासून सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत कर स्विकारला जाणार आहे. कर सवलतींचा जास्तीत-जास्त मालमत्ता धारकांनी लाभ घ्यावा, असं आवाहन महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**आंबा-मद्य**

गोव्यातून विदेशी मद्याची आंब्यांच्या पेट्यांमधून तस्करी करण्यात येत असल्याचा प्रकार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकानं उघडकीस आणला आहे. बारामती तालुक्यात मोरगाव-सुपा रस्त्यावर करण्यात आलेल्या कारवाईत गोव्यातील 12 लाख 61 हजारांच्या मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे.

**ईद**

ईद ऊल अजहा अर्थात बकरी ईद निमित्तं मुस्लिम बांधवांनी आज पुणे-सोलापूर रस्त्यावरील ईदगाह मैदानात सामुहिक नमाज पठण केलं. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नेते, कार्यकर्त्यांनी तसंच पोलिस प्रशासनातर्फे मुस्लिमधर्मिय नागरिकांना गुलाब पुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

**कलाश्री**

कलाश्री संगीत मंडळ आणि औंध सोशल फाउंडेशन यांच्या वतीनं देण्यात येणारा 'भारतरत्न पंडित भीमसेन जोशी पुरस्कार' यंदा पंडित सतीश तारे यांना आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या हस्ते समारोहाच्या समारोप कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. काम करतानाची तळमळ, जिद्द, याची दखल घेतल्याचं समाधान आहे अशी भावना पंडित तारे यांनी पुरस्कार स्विकारताना व्यक्त केली.

**पुरस्कार**

यशवंतराव चव्हाण केंद्राच्या वतीनं देण्यात देण्यात येणाऱ्या यशस्वीनी सन्मान पुरस्कारांचं वितरण 22 जून रोजी पुण्यात करण्यात येणार असल्याचं पुणे केंद्राचे सचिव अंकुश काकडे यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहा जणींची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**प्रकाशन**

संवेदनशील मनानं व्यक्त केलेली अभिव्यक्ती ही मनाला आनंद देते असं मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक डॉक्टर न. म. जोशी यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. अभिजित आंबेकर लिखित 'अभिव्यक्त' या काव्यसंग्रहाचं प्रकाशन करताना ते बोलत होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**